खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२५ – २६

### साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला : मा. राहूल गिरी

प्रभात

# देश घडविण्यात प्रत्येकाने आपली भूमिका बजावावी

**शिवव्याख्याते राहुल गिरी यांचे आवाहन**



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबराव बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत मार्गदर्शन करताना शिवव्याख्याते राहुल गिरी व उपस्थित मान्यवर, विद्यार्थी.

**राजगुरुनगर, दि. २७ (प्रतिनिधी)** - सद्य:स्थितीत आपल्या देशासमोर अनेक समस्या असून प्रत्येक नागरिकाने धर्म, जात, पंथ, वर्ण, लिंग यावर कोणताही भेदभाव न करता देशसेवेसाठी जिथे संधी मिळेल तेथे आपले योगदान द्यावे आणि देश घडविण्यात आपली भूमिका बजावावी, असे आवाहन शिवव्याख्याते राहुल गिरी यांनी केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत कालचा वारसा, उद्याचा वारसदार - वर्तमान पिढीची जबाबदारी या विषयावर ते बोलत होते. यावेळी संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एस. एस. जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक एन. एम. शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राहुल गिरी म्हणाले, आई-वडिलांच्या संस्कारांचा आवाज तुमच्या मनात कायम ठेवा. भावना ही जगण्याची खरी अभिव्यक्ती आहे. मोबाईलच्या अतिरेकामुळे माणूस भावनाशून्य होत चालला असून स्क्रीनचा वेळ कमी करा. फेसबुकवरील लाईक वाढवण्यापेक्षा समाजजीवनातील लायकी वाढवण्याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे. प्रजासत्ताकाचे सुख भोगणार्या आपल्या देशामागे क्रांतिकारक, राष्ट्रपुरुष व समाजसुधारकांच्या त्यागाचा व हौतात्म्याचा मोठा वारसा आहे. तो समजून घेऊन विद्यार्थ्यांनी उद्याच्या समर्थ भारताचे वारसदार व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

साहेबराव बुट्टेपाटील यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्यामुळे ते काळातून जरी दूर गेले असले तरी समाजाच्या काळजातून दूर गेले नाहीत. ते कायम विद्यार्थ्यांमध्ये जिवंत राहतील, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कैलास सोनवणे यांनी केले. प्रास्ताविक व परिचय प्रा. वर्षा कांबळे यांनी केला. कु. साक्षी शिवेकर हिने आभार मानले.

Pune Gramin Edition
Jan 28, 2026 Page No. 16
Powered by: erelego.com

केसरी

किरण खुडे (पत्रकार)



# आपल्या वाट्याचा देश घडवा

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** सद्य:स्थितीत आपल्या देशासमोर अनेक समस्या असून प्रत्येकाने धर्म,जात, पंथ, वर्ण, लिंग यावर कोणताही भेदभाव न करता देशसेवेसाठी जिथे संधी मिळेल तेथे आपल्या वाट्याचा देश घडवा, असे आवाहन शिवव्याख्याते राहूल गिरी यांनी येथे केले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत कालचा वारसा, उद्याचा वारसदार - वर्तमान पिढीची जबाबदारी या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, सतीश नाईकरे, व्याख्यानमाला समिती अध्यक्ष राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, डॉ. एस. एस.जगताप, उपप्राचार्य प्रा. व्ही.बी.दौंडकर प्रबंधक एन.एम.शिंदे उपस्थित होते.

राहूल गिरी म्हणाले, आई-वडिलांच्या संस्कारांचा आवाज तुमच्या कानात आणि मनात कायम ठेवा. भावना ही जगण्याची अभिव्यक्ती आहे. मोबाईलच्या अतिरेकामुळे माणूस भावनाशून्य होत चालला असून स्क्रीनचा वेळ कमी करा. फेसबुकवरील लाईक वाढवण्यापेक्षा समाजजीवनातील लायकी वाढवण्याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे. प्रजासत्ताकाचे सुख भोगणाऱ्या आपल्या देशाच्या पाठिशी क्रांतिकारक, राष्ट्रपुरुष व समाजसुधारकांच्या त्यागाचा, हौतात्म्याचा वारसा असून विद्यार्थ्यांनी तो समजून घेऊन उद्याच्या समर्थ भारताचा वारसदार व्हा असे आवाहन त्यांनी केले.



डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख